करोना २०२०/सूचना/आदेश क्र १९५

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

कोरोना २०२०/सूचना/आदेश क्रमांक - १९५
क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./कोरोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.7/०४/२०२०

**तात्काळ**

प्रति,
जिल्हा शल्य चिकित्सक रायगड-अलिबाग तथा सदस्य सचिव,
साहित्य खरेदी समिति

विषय :-राज्यात कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपययोजना व उपचारासाठी वैद्यकिय साहित्य व उपकरणे यांची उपलब्ध विविद दर करार व शासन उपक्रम व हाफकीनकडील निविदेच्या दरानुसार पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराकडून तातडीने खरेदी करणेबाबत.

संदर्भ:- १) या कार्यालयाकडील आदेश क्र.९७ दि.२३/०३/२०२०

२ मा.विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचेकडील पत्र क्र.साशा/कार्या-५/संकीर्ण/कोरोना/२०२० दि.२७/०३/२०२०

मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी वर सदर्भात क्र.२ मध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये राज्यात कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचारासाठी वैद्यकिय साहित्य व उपकरणे यांची उपलब्ध विविध दर करार व शासन उपक्रम व हाफकीनकडील निविदेच्या दरानुसार पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराकडून तातडीने खरेदी करण्यासाठी विविध अटी शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे असे कळविले आहे.

सोबत हाफकिन फार्मासीटीकल कार्पोरेशन कडून प्राप्त वेंडरची लिस्ट व दर देण्यात आले आहेत. तसेच जिल्हाधिकारी पालघर यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणाऱ्या उत्पादक कंपन्याचे पत्ते,संपर्क क्रमांक व उत्पादन क्षमता याबाबत माहिती संकलित करुन दिलेली आहे, ती यादी देखील सोबत जोडलेली आहे.

दिनांक २४ मार्च,२०२० रोजी मा.प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाय यांनी दिलेल्या महत्वाच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने नियामाचे व अटी शर्तीचे पालन करुन औषधी साहित्य व लॉजिस्टिक याची खरेदी करण्यात यावी.

१. खरेदी करतांना रुग्णालयाकडून प्राप्त मागणीनुसार खरेदी करण्यात यावी. अनावश्यक व मागणीपेक्षा जास्त खरेदी करण्यात येवू नये, व तसेच खरेदीची व्दिरुक्ती टाळण्यात यावी.
२. औषधी,साहित्य व इतर खरेदी करण्यापुर्वी जिल्हास्तरीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या औषधी खरेदी समितीची मान्यता देणे बंधनकारक राहिल.
३. औषधी साहित्य व इतर खरेदीसाठी दि.१.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.
४. औषधी साहित्य व इतर खरेदी करण्यसाठी हाफकिन फार्मासीटीकन कार्पोरेशन,MCGM,ESIS व इतर दरकराराचे तुलनात्मक तक्ता तयार करुन सर्वात कमी असलेल्या दराप्रमाणे खरेदी करण्यात यावी.

तरी मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी संदर्भिय क्र.२ मध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये दिलेल्या सूचना तसेच विविध अटी शर्तीना अधिन राहून जिल्हयात कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचारासाठी वैद्यकिय साहित्य व उपकरणे यांची तात्काळ खरेदी करण्यात यावी.सोबत संदर्भिय पत्राची पत्र जोडली आहे.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

प्रत:- मा.विभागीय आयुक्त,कोंकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई यांजकडे माहितीस्तव सादर
प्रत:- जिल्हा आरोग्य अधिकारी,रायगड यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
प्रत :- निवासी उपजिल्हाधिकारी,रायगड यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
प्रत:- जिल्हा कोषागार अधिकारी रायगड यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
प्रत:- महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र.रायगड यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**